जा.क्र. ७०५४८ २०२४
दि. २३/५४

मुंबई ग्राम पंचायत अधिनियम १९५८ चे कलम ५२ पोटकलम १ प्रमाणे इमारतीचे बांधकाम करणेस द्यावयाचा परवाना दाखला

ग्रामपंचायत काल्हेर, ता. भिवंडी, जि. ठाणे.

जा.न/मु.का/वशी/

दिनांक ११/०९/२०२०

श्री. आवळा महादू, मधुकर पाटील, दिलीप पाटील, कबीर पाटील, प्रभाकर पाटील व इतर रा. काल्हेर जि. ठाणे. यांस कळविण्यात येते की मौजे - काल्हेर, ता. भिवंडी, जि. ठाणे, येथील जुने घर क्र. सर्वे नं. ५७/३,अ, ७, ८,१४,१५,१८,२९,२१ /गावठाण सिटी सर्वे नं. /मध्ये त्यांना सर्वे नं. चा चार मजले क्षेत्रफळाच्या भुखंडावरील बांधकाम करणेबाबतचा / दुरुस्ती करणेबाबतचा दि / /२० चा अर्ज दि / /२० रोजी मिळाला. सदर अर्जावर ग्रामपंचायत सभा दि २६ / ०८ /२०२० मध्ये विचार विनिमय करून ठराव क्र. २४/२५ ने शासकीय खात्याच्या परवानगीस आधीन राहून, उपरोक्त अर्जानुसार खालील अटी/शर्तीवर बांधकाम करण्यास हे "नाहरकत परवाना" पत्र देण्यात येत आहे.

१. मुंबई ग्रा.प.अधिनियम १९५८ कलम ५२ पोट कलम ३ अन्वये परवानगी मिळाल्यापासून १ वर्षाचे आत बांधकामास सुरुवात करावी तसेच पोटकलम ४,५,६, घ्या तरतूदीचे अनुपालन करणे आपलेवर बंधनकारक राहील.

२. बांधकाम करणेपूर्वी आवश्यक असलेली महसूल खात्याची परवानगी घेणे आवश्यक असून स.नं.चा जागा एन.ए. (अकृषीक) झालेशिवाय बांधकामास सुरुवात करु नये.

३. कलम ५३ च्या तरतुदीचे संपूर्व बंधन आपल्यावर राहील. त्या नुसार सांडपाण्याची योग्य व्यवस्था करणे. तसेच क्र./व्ही पी.एम./२६९०/२८६५/प्र.क्र.३४३५/२२ ग्रामविकास विभाग/मंत्रालय १० जुलै १९९२ प्रमाणे शौचालय / व सांडपाणी पक्के गटार नसल्यास रस्त्यावर आणता येणार नाही

४. जागेच्या मालकी, वहीवाट संबंधी हरकत वा वाद निर्माण झाल्यास परवानगीस स्थगिती दिली जाईल व जोपर्यंत वाद मिटत नाही. तोपर्यंत स्थगिती कायम राहील. सदर वादाचे निराकरण अर्जदारांने करावयाचे असून निराकरण झालेनंतर पंचायतीस कळविले पाहिजे व स्थगिती रद्द करणेबाबत परवानगी घेतलेशिवाय बांधकाम करता कामा नये.

५. होणारे सर्व बांधकाम आपले मालकीच्या व बहीवाटीच्या जागेत करावयाचे असून छपराचे पडणाऱ्या पाण्यापासून कोणास त्रास होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

६. महाराष्ट्र रिजनल टाऊन प्लॅनींग ॲक्ट व महाराष्ट्र महसूल कादया या मध्ये असलेल्या तरतुदी प्रमाणे इमारत बांधकाम सुरु करणेपूर्वी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणे संकूलन रचना कार्यालय (टाऊन प्लॅनींग) ठाणे यांचे कार्यालयाकडून इमारत बांधकामाचे प्लॅन मंजूर झाल्याशिवाय बांधकामास सुरुवात करता कामा नये.

७. इमारतीय आजूबाजूस प्लॅनमध्ये दाखविल्याप्रमाणे मोकळी जागा न सोडल्यास, सदर "ना-हरकत प्रमाणपत्र रद्द करणेचा अधिकार ग्रा.प. ने राखून ठेवलेला आहे.

८. बांधकाम करताना, बांधकामासाठी वापरले जाणारे मटेरीयल अगर सामान या पासून नागरीकांच्या हरदारी अडथळा निर्माण होणार नाही, याची खबरदारी अर्जदार यांनी घ्यावयाची आहे..

९. इमारतचे सांडपाणी व सेप्टीक टँक मधून येणार सांडपाण याची व्यवस्था अर्जदार या स्वत: करावयाची आहे.

१०. इमारतीचे बांधकाम पूर्व झाल्यावर व सदरची इमारत निवासासाठी/व्यापारासाठी वापराकरिता योग्य असल्याबाबत वास्तुविशारद यांचा दाखला ग्रा पं. ला सादर केल्याशिवाय या इमारतीचा कुठल्याही प्रकारे वापर होणार नाही यांची खबरदारी अर्जदार यांनी घ्यायची आहे.

११. इमारतीचे बांधकाम करतांना कुठल्याही प्रकारचा गंभीर अपघात झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी अर्जदार यांचेवर राहील.

१२. इमारतीचा वापर गोडाऊन म्हाणून करावयाचा असल्यास अग्निशमन अधिकारी यांचेकडून "गोडाऊनसाठी योग्य" असा दाखला प्राप्त झाल्याशिवाय इमारतीचा वापर करु नये.

१३. बांधकामास सुरुवात करण्यापूर्वी सात दिवस आगाऊ बांधकाम केव्हा सुरू करणार याबाबत लेखी ग्रा. पं. कार्यालयात कळवावे.